# भूगोल

## उत्तरे : सराव प्रश्नपत्रिका 1 ली

**प्र. 1.**

(1) भारताला एकूण सुमारे <u>७,५००</u> किमीचा सागरी किनारा लाभला आहे.

(2) ब्राझीलच्या <u>अजस्र कड्याच्या वाऱ्याकडील बाजूच्या प्रदेशात</u> प्रतिरोध प्रकारचा पाऊस पडतो.

(3) ब्राझील देशाची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने <u>तृतीयक</u> व्यवसायावर अवलंबून आहे.

(4) भारतातील <u>डोंगराळ प्रदेशात</u> विखुरलेल्या वस्त्यांचा प्रकार आढळतो.

**प्र. 2.**

(1) भारतातील मैदानी प्रदेश – सुपीक मृदा – शेती व्यवसायाची भरभराट.

(2) सॅव्हाना – अवर्षण प्रतिकारक गवत – ब्राझीलची उच्चभूमी.


(3) भारतातील नगदी पीक – चहा – केरळ राज्य.

(4) मुंबई – आंतरराष्ट्रीय पर्यटन ठिकाण – गेट वे ऑफ इंडिया.

**प्र. 3.**

(1) बरोबर (2) चूक (3) बरोबर (4) बरोबर (5) बरोबर.

**प्र. 4. (अ)**



**प्र. 4. (आ)**

(1) ब्राझीलमधील ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात जास्त पाऊस पडतो.

(2) ब्राझीलकडे ईशान्य व आग्नेय दिशेने वारे येतात.

(3) ब्राझीलमधील वाऱ्यांना अजस्र कड्याचा व ब्राझीलच्या उच्चभूमीचा अडथळा निर्माण होतो.

(4) ब्राझीलमधील पॅराग्वे-पॅराना खोऱ्यात सरासरी तापमान कमी आहे.

(5) ब्राझीलमधील विषुववृत्तीय प्रदेशात तापमान जास्त आहे.

**प्र. 5.**

**(1)** (१) शेतीतील प्रगती, उद्योगांचा विकास, शिक्षणाचा प्रसार, वाहतुकीच्या सुविधांचा विकास, शैक्षणिक सुविधांची उपलब्धता इत्यादी कारणांमुळे भारतात नवनवीन शहरे उदयास येत आहेत.

(२) या शहरांमध्ये रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

(३) या शहरांत भारताच्या विविध भागांमधून लोक स्थलांतरित होऊन स्थायिक होत आहेत. त्यामुळे भारतामध्ये नागरीकरण वाढत आहे.

**(2)** (१) क्षेत्रभेटीदरम्यान आपल्यासोबत खाद्यपदार्थ, पाण्याची बाटली, कागद, पिशव्या इत्यादी अनेक वस्तू असतात. या वस्तूंच्या वापरानंतर त्या इकडेतिकडे टाकल्यास कचरा निर्माण होतो.

(२) कचऱ्यामुळे प्रदूषण होते व पर्यावरणास हानी पोहोचते.

(३) क्षेत्रभेटीदरम्यान शिस्तबद्धपणा अत्यावश्यक असतो. म्हणून क्षेत्रभेटीदरम्यान कचऱ्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे असते.

**(3)** (१) कोणत्याही देशाचा आर्थिक व सामाजिक विकास हा देशाची एकूण लोकसंख्या व लोकसंख्येची गुणवत्ता या घटकांवर अवलंबून असतो.

(२) एखाद्या देशाची लोकसंख्या प्रमाणापेक्षा अधिक असेल आणि लोकसंख्येची गुणवत्ता निम्न असेल, तर अशा देशाचा आर्थिक व सामाजिक विकास संथ गतीने होतो.


(३) एखाद्या देशात लोकसंख्या पर्याप्त असेल आणि लोकसंख्येची गुणवत्ता उच्च असेल, तर अशा देशाचा आर्थिक व सामाजिक विकास जलद गतीने होतो. अशा प्रकारे लोकसंख्या हे एक महत्त्वाचे संसाधन आहे.

**(4)** (१) भारतात प्रामुख्याने नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे पाऊस पडतो. नैर्ऋत्य मोसमी वारे भारताच्या दक्षिण भागातून भारतात प्रवेश करतात आणि टप्प्याटप्प्याने उत्तरेकडे वाहत जातात.

(२) भारताच्या मुख्य भूमीवरून वाहणारे नैर्ऋत्य मोसमी वारे हे हिमालयाच्या शिवालिक व हिमाचल रांगांद्वारे अडवले जातात आणि तेथून हे वारे परत हिंदी महासागराकडे मागे फिरतात.

(३) ईशान्य दिशेकडून वाहणाऱ्या या ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारताच्या द्वीपकल्पीय भागांत पुन्हा मान्सून परतीचा पाऊस पडतो. अशा प्रकारे ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारतात पाऊस पडतो.

**प्र. 6. (अ)**




(1) वरील आकडेवारीतील वर्षांतर १० वर्षांचे आहे.

(2) १९६१-१९७१ मध्ये नागरीकरणाचा वेग सर्वांत कमी दिसतो.

(3) १९७१-१९८१ मध्ये नागरीकरणाचा वेग सर्वांत जास्त आहे.

**प्र. 6. (आ)**

(1) भारत – वय आणि लिंग मनोरा.

(2) सर्वाधिक लोकसंख्या १० ते १४ या वयोगटात आहे.

(3) 'य' अक्षावर दिलेल्या वयोगटातील वर्गांतर ४ आहे.

(4) ६० पेक्षा जास्त वयोगटात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.

(5) ५५ ते ५९ या वयोगटात स्त्रियांचे प्रमाण २.० टक्के आहे.

(6) १० ते १४ या वयोगटानंतर लोकसंख्येत घट होताना दिसते.

**प्र. 7.**

**(1)** (१) भारतात हिमालय पर्वतरांगांत वने आढळतात. या वनांना 'भारतातील हिमालयीन वने' असे संबोधतात. भारतीय हिमालयात उंचीनुसार वनांचे तीन प्रकार पडतात.

(२) हिमालयातील अतिउंच प्रदेशांत हवामान अतिशय थंड असते. या प्रदेशात उन्हाळ्यात काही प्रमाणात बर्फ वितळते. त्यामुळे येथील वनस्पतींना उन्हाळ्याच्या हंगामात रंगीबेरंगी फुले येतात.

(३) हिमालयातील मध्यम उंचीवरील प्रदेशांत पाईन, देवदार, फर अशा सूचिपर्णी वृक्षांची वने आढळतात. या वनांतील वृक्षांची पाने टोकदार व निमुळती असल्यामुळे या पानांवर पडणारे बर्फ पानांवरून खाली घसरते.

(४) हिमालयातील कमी उंचीच्या म्हणजेच पायथ्यालगतच्या प्रदेशांत सूचिपर्णी व पानझडी वृक्ष अशी मिश्र वने आढळतात. या वनांमध्ये प्रामुख्याने साल वृक्ष मोठ्या प्रमाणात आढळतात.

**(2)** (१) क्षेत्रभेटीमुळे विविध स्थानांची माहिती मिळते. स्थानांची भूरचना, तापमान, पर्जन्यमान इत्यादी घटकांचा अभ्यास करता येतो.

(२) **उदा.,** क्षेत्रभेटीद्वारे समुद्रसपाटीजवळील ठिकाणाचे तापमान तुलनेने अधिक व समुद्रसपाटीपासून अधिक उंचीवर असलेल्या ठिकाणाचे तापमान तुलनेने कमी याचा अनुभव घेता येतो.

(३) क्षेत्रभेटीदरम्यान स्थानिक लोकांशी संपर्क साधून विशिष्ट ठिकाणी राहणाऱ्या लोकांच्या आहाराची, पेहरावाची, संस्कृतीची माहिती मिळवता येते.

(४) **उदा.,** क्षेत्रभेटीदरम्यान समुद्रकिनारपट्टीच्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या आहारात भात व मासे हे पदार्थ अधिक असल्याची माहिती मिळवता येते.

**(3)** स्वातंत्र्योत्तर काळात भारत आणि ब्राझील या देशांना प्रामुख्याने पुढील समस्यांना तोंड द्यावे लागले :

(१) स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या वीस वर्षांत भारताला तीन युद्धांना सामोरे जावे लागले.

(२) स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील विविध प्रांतांतील लोकांना दुष्काळांनाही सामोरे जावे लागले.

(३) स्वातंत्र्योत्तर काळात भारतास विविध वित्तीय समस्या, आर्थिक विकासाचा मंद वेग इत्यादी समस्यांनाही तोंड द्यावे लागले.

(४) स्वातंत्र्योत्तर काळात ब्राझील देशास विविध स्वरूपांच्या वित्तीय समस्यांना तोंड द्यावे लागले.